**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार, दिनांक २० जुलै २०२४**

**ठळक बातम्या**

1. **नागपूर सहित पुर्व विदर्भातील मुसळधार पाऊसामुळे जनजीवन विस्कळीत' आज नागपूर जिल्ह्याकरिता हवामान खात्याचा अतिवृष्टीचा रेड अलर्ट तर उद्या ऑरेंज अलर्ट घोषित.**
2. **वैद्यकीय क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी आयुर्वेद क्षेत्रातील नव संशोधनांकडे वळावे -केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांचे वर्ध्याच्या दत्ता मेघे अभिमत विद्यापीठाच्या १५ व्या दीक्षान्त समारोहाप्रसंगी आवाहन.**
3. **बीएसएनएल नागपूर क्षेत्राद्वारे नागपुरच्या 137 दुर्गम गावात 4जी सेवा मिळणार; गेल्या महिन्याभरात नागपूर शहरात साडेतीन हजार ग्राहकांनी मोबाईल सीम केले बीएसएनएल मध्ये पोर्ट; मुख्य महाव्यवस्थापक यश पान्हेकर यांची माहिती.**

**आणि**

4. **केंद्रीय लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष मनोज सोनी यांनी दिला आपल्या पदाचा राजीनामा.**

****

विदर्भ हवामान -पाऊस

आज पहाटे पासून नागपूरसहीत पुर्व विदर्भातील गडचिरोली, गोंदीया , भंडारा वर्धा तसेच पश्चिम विदर्भातील अमरावती यवतमाळ या ठिकाणी मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत झालं. **नागपूर**च्या सखल भागात पाणी साचल्याने नागपूर महानगरपालिकेनं अग्निशमन दलाच्या

पंपाद्वारे या भागातील पाणी बाहेर काढले वर्धा रोडवरील मनीष नगर अंडर पास मधील देखील पाणी याच पद्धतीने बाहेर काढण्यात आले. बेसा पीपळा या नागपूर नजीक असलेल्या नगरपंचायतीच्या अधीन येणाऱ्या घोगली नाल्यावरून पाणी वाहत असल्यानं इथल्या वाहतुकीस प्रतिबंध करण्यात आला .दुपारी बाराच्या सुमारास पावसाने विश्रांती घेतली. लक्ष्मी नगर, गांधीबाग या ठिकाणी मुसळधार पावसामुळे उन्मळून पडलेले मोठे वृक्ष महानगरपालिकेच्या पथकाने कापून दूर केले. दरम्यान मुसळधार पावसाच्या आणि हवामान खात्याने दिलेल्या सतर्कतेच्या इशाराने नागपूर जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर यांनी नागपूर जिल्ह्यातील सर्व शाळा महाविद्यालय यांना सुट्टी जाहीर केली होती .राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने सुद्धा आपल्या महाविद्यालय आणि प्रशासकीय विभागांना सुट्टी जाहीर केली होती. परंतु जिल्हा प्रशासनाचे हे निर्देश नागपूरातील जनतेला उशिरा पोहोचल्यामुळे शाळा-महाविद्यालयात निघालेल्या विद्यार्थ्यांना त्रास झाला. दरम्यान, नागपूर जिल्ह्यामध्ये आज पासून ते 24 जुलै पर्यंत मेघगर्जनेसह मुसळधार पाऊसाची शक्यता वर्तवण्यात आली आज 20 जुलै रोजी करिता अतिवृष्टीचा रेड अलर्ट तर उद्या 21 जुलै रोजी ऑरेंज अलर्ट घोषित करण्यात आला आहे. **वर्धा** जिल्ह्यामध्ये आज सकाळपासूनच जोरदार पाऊस सुरू होता. रेहकी (कला) येथील सेलू ते येळाकेळी मार्गावरील पुलावरून अंदाजे २ फुटाचे वर पाणी वाहत असल्या कारणामुळे सेलू ते येळाकेळी वाहतूक बंद झाली होती. **गडचिरोली मध्ये** रात्रीपासून जिल्ह्यात सर्वत्र मुसळधार पाऊस पडल्याने अनेक नद्या आणि नाल्यांना पूर आला असून, 27 मार्गांवरील वाहतूक प्रभावित झाली आहे. भामरागडनजीकच्या पर्लकोटा नदीच्या पुलावरुन पाणी वाहू लागल्याने तेथे बॅरिकेट लावून पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. पुरामुळे आलापल्ली-भामरागड, भामरागड-एटापल्ली

अहेरी-मोयाबीनपेठा, कुरखेडा-चारभट्टी, आलापल्ली-सिरोंचा, जारावंडी ते पाखांजूर, पोर्ला-वडधा, वैरागड-शंकरपूर या आठ मार्गांवरील वाहतूक ठप्प झाली आहे.दरम्यान, **भंडारा** जिल्ह्यातील गोसेखुर्द प्रकल्पाचे ३३ पैकी २७ दरवाजे उघडण्यात आले असून, तेथून ३ हजार ३३ क्युमेक्स, तर तेलंगणा राज्यातील मेडिगड्डा बॅरेजमधून १० हजार ५७६ क्युमेक्स पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. गोसेखुर्द धरणातून ५ हजार क्यूमेक्सपर्यंत पाण्याचा विसर्ग वाढविणार असल्याने नदीकाठावरील गावकऱ्यांनी सतर्क राहावे, असा इशारा जिल्हा प्रशासनाने दिला आहे. नागपूर रायपूर महामार्गावरील वैनगंगा नदी जवळील कारधा टोल जवळील दरड कोसळल्याने महामार्गावर तासभर मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली होती,प्रशासनाच्या प्रयत्नांनी आता वाहतूक कोंडी सुटली आहे. **गोंदिया** जिल्यात काल रात्रीपासून पावसाने सर्वच तालुक्यात दमदार हजेरी लावली आहे तर मुख्यतः देवरी आणि अर्जुनी मोरगाव तालुक्यात अतिवृष्टी झाली सध्या धान्य पिकांच्या रोवणीचे कामे सुरु असल्याने शेतकरी देखील आपल्या शेतात जाऊ शकले नाही. **अमरावती** जिल्ह्यात मागील 48 तासांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे अनेक गावांमध्ये पावसाचे पाणी घरात शिरले असून नदी नाले, दुथडी भरून वाहू लागले आहेत. विविध तालुक्यातील स्थानिकांकडून मिळालेल्या माहितीनुसार सध्या मेळघाटातील लहान-मोठे नदी नाले दुथडी भरून वाहत आहेत त्यामुळे काही गावांमध्ये संपर्क तुटलाअंजनगाव दर्यापूर तालुक्यांमध्ये असलेल्या केळी पिकाचे यामुळे काही प्रमाणात नुकसान झाले आहेत.

**यवतमाळ** जिल्ह्यात आज सकाळपासून सर्वदूर पावसाची रिपरिप सुरू आहे. त्यामुळे लघु तथा मध्यम मध्यम प्रकल्प ओव्हरफ्लो झाले आहेत. **अकोला** जिल्ह्यात पुढील पाच दिवस सोसाट्याच्या वाऱ्यासह पावसाची

शक्यता प्रादेशिक हवामानशास्त्र विभागाने वर्तविली आहे. मागील आठ ते दहा दिवस पावसाने दडी मारली होती आणि कमाल तापमानातही वाढ झाल्याने पिकांना झळ बसणे सुरू झाले होते. काही भागात पिकं कोमजली होती. अशावेळी दोन दिवस पाऊस पडल्याने माना टाकणाऱ्या पिकांना संजीवनी मिळाली आहे. दरम्यान, चंद्रपूर जिल्ह्यात पावसाची संततधार सुरु असून नागभीड इथं नाल्याच्या पाण्यात दोन मुलं वाहून गेल्याच वृत्त आहे.

प्रतापराव जाधव

वैद्यकीय क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी आयुर्वेदातील सिद्धांतांच्या अभ्यास करून या विज्ञानाची पवित्रता कायम राखावी तसेच या क्षेत्रातील तज्ञ चिकित्सक यांच्याशी चर्चा करून आयुर्वेद क्षेत्रातील नव संशोधनांकडे सुद्धा वळावे असे आवाहन केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज वर्धा येथे केले. वर्ध्याच्या सावंगी मेघे येथील दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था अभिमत विद्यापीठाचा १५वा दीक्षान्त समारोहाला संबोधित करताना ते आज बोलत होते. याप्रसंगी विद्यापीठाचे कुलपती दत्ता मेघे, कुलगुरू डॉ.ललित वाघमारे नाशिकच्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरू लेफ्टनंट जनरल डॉ. माधुरी कानिटकर प्रामुख्याने उपस्थित होते. दत्ता मेघे अभिमत विद्यापीठ तसेच नागपूर येथील आयुष मंत्रालय अंतर्गत केंद्रीय आयुर्वेदिक विज्ञान आणि अनुसंधान परिषद -सीसीआरएएस या संस्थाद्वारे सिकलसेल ॲनिमिया यावर संशोधन प्रकल्प राबवला जात आहे. हा प्रकल्प सिकलसेल वर उपचार तसेच सिकल सेलग्रस्त रुग्णांच्या जीवनात सुधारणा आणण्यासाठी सहाय्यभूत ठरेल असे देखील प्रतापराव जाधव यांनी यावेळी स्पष्ट केलं. यावेळी विविध शाखेच्या परीक्षांमध्ये

सर्वोत्कृष्ट ठरलेल्या ७८ विद्यार्थ्यांना ११५ सुवर्ण, ७ रौप्य तर १३ कुलपती विशेष पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

बीएसएनएल

केंद्र सरकारच्या माहिती आणि इलेक्ट्रॉनिक तंत्रज्ञान मंत्रालयाच्या अंतर्गत भारतीय संचार निगम लिमिटेड अर्थात बीएसएनएल हा सार्वजनिक उपक्रम सदैव ग्राहकांच्या सेवा केंद्रीत दृष्टिकोनाने काम करत असून केवळ नफा मिळवणे हा उद्देश नाही. 4 जी सेच्युरेशन प्रकल्पाच्या अंतर्गत नागपूर जिल्ह्यातील 137 गावांमध्ये जेथे कुठलीही मोबाईल सेवा नव्हती तेथे बीएसएनएलची 4 जी सेवा आता उपलब्ध होत आहे. यामध्ये नागपूर मध्य प्रदेश सीमेवरील पारशिवनी, रामटेक अशा तालुक्यातील दुर्गम गावामध्ये देखील 4जी सेवा पोचली आहे अशी माहिती बीएसएनएल नागपूरचे मुख्य महाव्यवस्थापक यश पान्हेकर यांनी आज नागपूर मध्ये दिली. बीएसएनएल च्या इतर खाजगी ऑपरेटर पेक्षा कमी असलेल्या दरामुळे या 3 जुलैपासून नागपूर शहरात 3,500 मोबाईल सिम कार्ड बीएसएनएलमध्ये पोर्ट झाले आहेत. आतापर्यंत नागपूर जिल्ह्यामध्ये दोन लाख वीस हजारापेक्षा जास्त बीएसएनएल मोबाईल सिमचे ग्राहक आहेत. 21 हजारापेक्षा जास्त लॅंडलाईन फोन हे वापरात आहेत. फायबर टू द होम-एफटीटीएच या ऑप्टिक फायबरद्वारे उच्च गतीच्या इंटरनेटचे सुद्धा 23 हजार ग्राहक सध्या नागपूर जिल्ह्यात आहेत. सध्याच्या कॉपर नेटवर्कचे रूपांतरण ऑप्टिक फायबर नेटवर्कमध्ये करण्याचे काम सुद्धा चालू आहे. नागपुरातील मोक्याच्या ठिकाणी असलेल्या बीएसएनएलच्या जागा शासकीय तसेच खाजगी संस्थांना देऊन ही बीएसएनएलच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होत आहे असेही यश पान्हेकर यांनी यावेळी सांगितलं. सध्या अस्तित्वात असलेल्या 4 जी तंत्रज्ञानाला 2025 च्या वर्षा अखेरीस 5 जी पर्यंत

रूपांतरित करण्याचा निर्धार हा बीएसएनएलचा आहे असे देखील त्यांनी स्पष्ट केलं.

राजीनामा

UPSC अर्थात केंद्रिय लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष मनोज सोनी यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. आपला राजीनामा त्यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे सुपूर्द केला आहे. त्यांचा कार्यकाळ २०२९ मध्ये संपणार होता, पण आपल्या वैयक्तिक कारणांसाठी त्यांनी राजीनामा देत असल्याचं सांगितलं.

'ऑक्सिजन पार्क'

पूर्णपणे पक्ष्यांसाठी समर्पित असा 'बर्ड पार्क' आणि सर्वसामान्य नागरिकांना शुद्ध हवा देणारा 'ऑक्सिजन पार्क अशी अनोखी भेट पुढील महिन्यात नागपूरकरांना देणार असल्याची घोषणा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आजकेली. ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठानच्या वतीनं आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. ज्येष्ठ नागरिकांच्या तीर्थ पर्यटनासाठी आज आणखी एक इलेक्ट्रिक बस दाखल झाली असून त्याचे उद्घाटन गडकरी यांच्या हस्ते झाले. यावेळी गडकरी यांनी 'ऑक्सिजन पार्क'ची माहिती दिली. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने जामठा परिसरातून जाणाऱ्या आऊटर रिंगरोडवर हा ऑक्सिजन पार्क निर्माण केला आहे. गडकरी यांच्या संकल्पनेतून हा पार्क साकारण्यात आला आहे. त्यामुळे दिव्यांग पार्कनंतर आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण ठिकाण नागपूरकरांसह पर्यटकांचे लक्ष वेधून घेणार आहे. या पार्कमध्ये एक कॅफे, सायकल ट्रॅक, फक्त पक्ष्यांसाठी असलेली फळझाडे आदींचा समावेश असेल.

अकोला कृषि विद्यापीठ

देशांतर्गत सध्याची परिस्थिती लक्षात घेता भविष्यात शासकीय नोकऱ्या मिळणे अधिकच अवघड असून कृषीचे शिक्षण घेतलेल्या पदवीधरांनी नोकरी मागणारे न होता इतरांना नोकरीसह रोजगार देणारे व्हावे असे आवाहन डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोलाचे कुलगुरू डॉ.शरद गडाख यांनी केलं. विद्यापीठा अंतर्गत कृषी आणि तत्सम शाखांमध्ये पदवीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना, पदवीधरांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी अकोला कृषि विद्यापीठाचा नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहे त्याप्रसंगी आयोजित चर्चासत्रातते बोलत होते. यशस्वी व्यवसायाकरिता भाग भांडवला सोबतच संबंधित व्यवसायाचे संपूर्ण ज्ञान आणि सर्वात महत्त्वाचे स्वतःचा आत्मविश्वास गरजेचा असल्याचे त्यांनी उपस्थित भावी उद्योजक कृषी पदवीधरांना उद्देशून सांगितले.

*****